# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२१

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### वडाळा (मुंबई) टी.टी. येथे श्री. हिरामणी तिवारी यांना मारहाण करणाऱ्या गुंडाविरोधात कारवाई करण्याबाबत

**(१) ८८९ (१८-०३-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २२ डिसेंबर, २०१९ रोजी फेसबुकवरुन आक्षेपार्ह मजकूर प्रसिध्द (व्हायरल) केल्याप्रकरणी समाधान जुगदर, प्रकाश हसबे, श्रीकांत यादव, सत्यवान कोळंबेकर आदी गुंडानी श्री.हिरामणी तिवारी यांना जबर मारहाण करुन जबरदस्तीने त्याचे मुंडण केल्याप्रकरणी वडाळा (मुंबई) टी.टी. पोलीस स्थानकात तक्रार दिली असता, पोलिसांनी गुन्हा दाखल न करता याकडे दुर्लक्ष करुन प्रकरण दाबून टाकण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे माजी खासदार किरीट सोमय्या व आमदार तामिळ सेलवन यांनी दिनांक २५ डिसेंबर, २०१९ रोजी पोलीस स्थानकाबाहेर आंदोलन केल्यानंतर पोलिसांनी उक्त प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गुन्हा दाखल करुन न घेणाऱ्या पोलीस अधिकारी व संबंधित प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१५-०६-२०२१) :** (१) हे खरे नाही.

दिनांक २२/१२/२०१९ रोजी फेसबुकवरुन आक्षेपार्ह मजकुर प्रसिध्द केल्यावरुन घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने श्री.हिरामण विजेंद्रमणी तिवारी व विरोधक यांना वडाळा टी.टी. पोलीस ठाण्यात आणले असता, त्यांनी एकमेकांविरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे सांगितले. परंतु कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून फौजदारी प्रक्रिया संहितामधील कलम १४९ नुसार त्यांना शांतता राखण्याची समज देण्यात येऊन त्याबाबत ठाणे दैनंदिनी क्रमांक ३०/२०१९, दिनांक २२/१२/२०१९ अन्वये नोंद घेण्यात आली.

दिनांक २३/१२/२०१९ रोजी श्री.हिरामणी विजेंद्रमणी तिवारी वडाळा टी.टी. पोलीस ठाण्यात तक्रार देण्याकरीता आले असता त्यांचा जबाब नोंद केला व त्यांनी सांगितलेल्या जबाबावरुन आरोपींविरोधात अदखलपात्र गुन्हा नोंद क्र.२७७२/२०१९ कलम ३२३, ५००, ५०४, ५०६, ३४ भा.दं.वि. अन्वये अदखलपात्र तक्रार नोंद करण्यात आली.

त्यानंतर प्राप्त माहितीवरुन तसेच चित्रीकरणाच्या पडताळणी दरम्यान दखलपात्र गुन्हा घडल्याचे निष्पन्न झाल्याने श्री.हिरामणी विजेंद्रमणी तिवारी यांना दिनांक २४/१२/२०१९ रोजी फिर्यादी म्हणून दखलपात्र गुन्हयाच्या प्रथम खबरी अहवालावर सही करण्यासाठी पोलीस ठाण्यात बोलाविले असता प्रथम ते आले नाहीत. तद्नंतर दिनांक २५/१२/२०१९ रोजी सदर फिर्यादी हजर राहिले असता त्यांचा सविस्तर जबाब नोंद करुन गु.र.क्र.४२२/२०१९ कलम १४३, १४७, १४९, ३२५, ३४२, ३२३, ५०४, ५०६, ५०६(२) भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दिनांक २५/१२/२०१९ रोजी माजी खासदार श्री.किरीट सोमय्या व मा.आमदार तामिळ सेलवन यांनी पोलीस ठाण्याच्या बाहेर आंदोलन करण्यापूर्वीच रितसर पध्दतीने नमुद गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु

करण्यात आली होती. त्यामुळे माजी खासदार श्री.किरीट सोमय्या व मा.आमदार तामिळ सेलवन यांनी पोलीस ठाण्याच्या बाहेर आंदोलन केल्यानंतर पोलिसांनी उक्त प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे, हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील शेतकऱ्यांनी किसान सन्मान योजनेंतर्गत कर्जमाफीसंदर्भात केलेल्या तक्रारीबाबत

**(२) १६५६ (१८-०३-२०२०). श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील अत्यल्प, अल्पभुधारक व इतर अनेक शेतक-यांनी किसान सन्मान योजनेंतर्गत कर्जमाफीसंदर्भात केलेल्या तक्रारीचा निपटारा करण्यासाठी तालुकास्तरीय समिती गठीत करण्यात आली असून उक्त समितीकडे ८८१ शेतकऱ्यांच्या तक्रारी आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने किती शेतकरी कर्जमाफीकरीता पात्र ठरले आहेत व किती अपात्र ठरले आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२२-०३-२०२१) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ अंतर्गत शेतकऱ्यांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी गठीत तालुकास्तरीय समितीकडे एकूण १०७८ तक्रार अर्ज प्राप्त झाले. उक्त सर्व प्राप्त तक्रार अर्ज निकाली काढण्यात आले असून त्यापैकी ४८ शेतकऱ्यांना पात्र व १०२७ शेतकरी अपात्र ठरविण्यात आले. तसेच ३ शेतकऱ्यांची नावे अपलोड करणेबाबत बँकांना कळविण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली येथील बसस्थानकाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(३) १६७१ (१८-०३-२०२०). श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली येथील बसस्थानकाच्या नवीन इमारतीचे बांधकाम अत्यंत संथगतीने सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त इमारतीचे बांधकाम संथगतीने सुरु असण्याची कारणे काय आहेत, तसेच सदर इमारतीचे बांधकाम कधीपर्यंत पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०२-०६-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) बसस्थानकाच्या इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आहे. मात्र कोरोना साथीमुळे सद्य:स्थितीत काम बंद असून, निधीच्या उपलब्धतेनुसार सदरचे काम सत्वर पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईत नागरी संरक्षण दलामार्फत बसविण्यात आलेले भोंगे बंदवस्थेत असल्याबाबत

**(४) २२९५ (१८-०३-२०२०). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) युध्दजन्य तसेच आपत्कालीन परिस्थितीत सर्वसामान्य नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यासाठी मुंबईत सन १९६२ मध्ये बसविण्यात आलेल्या ३०६ पैकी १६८ भोंगे विनावापर बंद असल्याची, तर उर्वरित १३८ भोंगे दिखाऊ असल्याची बाब दिनांक ३१ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरी संरक्षण दलाकडून स्वयंसेवक घडवले जात नसल्याने दिखाऊ बनलेल्या भोंग्यांची दर महिन्याला केली जाणारी चाचणी बंद असून शासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने अद्यावत तंत्रज्ञानाअभावी सन २००४ पासून सदर भोंग्याची स्वयंचलित यंत्रणा पूर्णपणे बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई हे शहर नेहमीच दहशतवाद्यांच्या निशाण्यावर असल्याने दहशतवादी किंवा हवाई हल्ल्यादरम्यान मोबाईल व इतर यंत्रणा बंद पडत असल्याने नागरिकांना सतर्क करण्यासाठी भोंगे महत्त्वाची भूमिका बजावू शकणारे असल्याने सदरहू भोंगे कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२४-०६-२०२१) :** (१) मुंबई सह राज्यात ठाणे, पुणे, नाशिक, उरण, तारापूर या ठिकाणी नागरी संरक्षण दलातील सायरन आहेत. सर्व ठिकाणी एआरपी (एअर रेड प्रिकॉशन) यंत्रणा कालबाह्य झाल्याने सर्व भोंगे एकत्रित वाजत नाहीत. परंतु बृहन्मुंबईसह इतर सर्व ठिकाणी असलेले भोंगे वेतनीक कर्मचाऱ्याव्दारे हस्तचलित वाजविले जातात. एआरपी यंत्रणा कालबाह्य झाल्याने तत्कालीन संचालकांच्या आदेशानुसार बृहन्मुंबईतील १७८ भोंगे गोदामात ठेवण्यात आले आहेत. त्यापैकी ५ भोंगे पुन्हा कार्यान्वित करण्यात आले आहेत. १३३ भोंगे टॅपिंग पध्दतीने आजतागायत Stand alone mode वर चालू आहेत. काढलेले भोंगे जेथे शक्य आहे त्या ठिकाणी टॅपिंग पध्दतीने बसविण्याचे काम सुरु आहे.

(२) व (३) सध्या चालु असलेले १३३ भोंगे नागरी संरक्षण दलातील वेतनीक कर्मचाऱ्याव्दारे हस्तचलित वाजविले जातात. भोंग्याचे स्वयंचलित यंत्रणा २००४ पासून कालबाह्य झाल्याने नवीन यंत्रणा कार्यान्वित करण्याचे काम हाती घेतलेले आहे. दरम्यानच्या कालावधीत MTNL आणि BSNL या केंद्र शासकीय आस्थापनांबरोबर वेळोवेळी सायरन वाजविण्याकरीता चर्चासत्रे व

बैठका आयोजित करण्यात आल्या असून, अद्याप सदर दोन्हीही आस्थापनांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने, अद्याप सदरहू यंत्रणा स्वयंचलितरित्या कार्यान्वित होऊ शकली नाही. यासाठी संचालक, नागरी, संरक्षण, मुंबई यांचेकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मेयो मेडीकल रुग्णालयात “पीपीई” कीट्सचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(५) २८५५ (०२-०६-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.सुरेश धस, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील मेयो मेडीकल रुग्णालयात “पीपीई” कीट्सचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे रूग्णालय प्रशासनाने वैद्यकीय शिक्षण विभागाकडे “पीपीई” कीट्सची मागणी करुनही कीट्स उपलब्ध करण्यात आले नसल्याची बाब माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रूग्णालय प्रशासनाने स्थानिक पुरवठादार यांच्याकडे १००० कीट्सची मागणी केली असता त्याच्याकडून केवळ १०० कीट्स उपलब्ध झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (०८-०६-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दिव्यांगाचे बनावट प्रमाणपत्र देवून शासकीय सेवेचा गैरवापर केल्याबाबत

**(६) ३०२१ (०२-०६-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर : तारांकित प्रश्न क्रमांक २१७ ला दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा परिषदेंतर्गत कार्य करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी मुख्यत: शिक्षकांमध्ये दरवर्षी बदली व पदोन्नतीसाठी बनावट दिव्यांग प्रमाणपत्र देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिखली (जि.बुलढाणा) पंचायत समितीमध्ये कार्यरत असलेले सर्वश्री. विष्णू झगरे व संजय खेडेकर यांच्याकडे वाहन परवाना व जिल्हा परिषद शिक्षक कर्मचारी क्रीडा स्पर्धा सन २०१६-२०१७ मध्ये प्राविण्य मिळविल्याचे प्रमाणपत्र असून देखील त्यांच्याकडे ५२% हेमी पॅरालिसिस असल्याचे दिव्यांग प्रमाणपत्र आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच श्री.अरुण दगडू गरुड, शिक्षक पंचायत समिती चिखली यांच्याकडे देखील वाहन परवाना व जिल्हा परिषद शिक्षक कर्मचारी क्रीडा स्पर्धा सन २०१६-२०१७ मध्ये प्राविण्य मिळविल्याचे प्रमाणपत्र असून त्यांच्याकडेही ४५% अस्थिव्यंग असल्याचे प्रमाणपत्र आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या शिक्षकांसह अनेक शिक्षक व कर्मचारी बनावट दिव्यांग प्रमाणपत्र काढून शासकीय सेवेचा गैरवापर करीत असल्याच्या तक्रारी अनेक संघटनांनी प्रशासनाकडे केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बनावट दिव्यांग प्रमाणपत्र देणाऱ्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०१-०६-२०२१) :** (१), (२) व (३) पंचायत समितीमध्ये कार्यरत असलेले श्री.विष्णू झगरे यांच्याकडे वाहन परवाना आहे. परंतु ते अपंग असल्याचे कार्यालयीन अभिलेख्यात नोंद नाही. श्री.संजय खेडेकर

यांच्याकडे वाहन परवाना असून ४५% अस्थिव्यंग असल्याचे दिव्यांग प्रमाणपत्र आहे. परंतु या दोघांनीही जिल्हा परिषद शिक्षक कर्मचारी क्रीडा स्पर्धा सन २०१६-२०१७ मध्ये भाग घेतलेला नसल्यामुळे स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळविलेले नाही. श्री.अरूण दगडू गरूड शिक्षक यांच्याकडे वाहन परवाना असून ते ४५% अस्थिव्यंग असल्याचे प्रमाणपत्र आहे. परंतु जिल्हा परिषद शिक्षक कर्मचारी क्रीडा स्पर्धा सन २०१६-२०१७ मध्ये भाग घेतलेला नसल्यामुळे स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळालेले नाही.

(४) होय.

(५) दिव्यांग प्रमाणपत्राच्या वैधतेची पडताळणी वैद्यकीय मंडळाकडून घेण्याबाबत पत्र क्र. बुजिप/साप्रवि-२१४९/२०१७, दिनांक २२/०६/२०१७ नुसार सर्व कार्यालय प्रमुखाला देण्यात आले होते. सदर दिनांक २२/०६/२०१७ च्या पत्राला आवाहन देण्याकरीता श्री.प्रदिप अपार व इतर ९५ शिक्षकांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. ४७८४/२०१७ दाखल केले. तसेच महाराष्ट्र राज्य अपंग अधिकारी व कर्मचारी संघटना जिल्हा शाखा बुलढाणा यांनी सुध्दा मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. ६२६१/२०१७ दाखल केली. सदर याचिकेच्या अंतरिम निकालानुसार दिनांक २२/०६/२०१७ च्या पत्राला स्थगिती देऊन जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. सदर प्रकरणात न्यायालयाने अंतिम निकाल दिलेला नसल्यामुळे जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत काही अधिकारी व कर्मचारी खास करून शिक्षकांमध्ये दरवर्षी बदली व पदोन्नतीसाठी बनावट दिव्यांगाचे प्रमाणपत्रे, शासकीय सेवेत गैरवापर झाला किंवा नाही याबाबतची पडताळणी करता आलेली नाही. तसेच संबंधितांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

---

## अंधेरी (मुंबई) येथील आंबिवली गावातील भूखंड गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(७) ३०४३ (२९-०५-२०२०). श्री.विलास पोतनीस** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी, मुंबई येथील डी.एन.नगर मेट्रो स्थानकाजवळील मौजे आंबिवली गावातील सी.टी.एस.क्र. ८६६, ए, बी, सी, आणि डी या भूखंडावरील आरक्षणात नियमबाह्यरित्या केलेला बदल, हरितपट्टयावर करण्यात येत असलेले बांधकाम तसेच एफ.एस.आय. गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.नगर विकास मंत्री महोदयांकडे दिनांक १८ मार्च, २०२० रोजी लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरह भूखंडावर नियमबाह्य बांधकाम करणाऱ्या तसेच उक्त बांधकामास अभय देणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२५-०६-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

मा.विलास पोतनीस, विधानपरिषद सदस्य यांनी दिनांक ११/०३/२०२० रोजीच्या पत्राव्दारे निवेदन दिले आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील मौजे आंबिवली गावातील सी.टी.एस.क्र. ८६६, ए, बी, सी, आणि डी च्या जागेवर महानगरपालिकेच्या तत्कालीन विकास योजना-१९९१ मध्ये शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार फेरबदल मंजूर केले असून विकास नियंत्रण नियमावली-१९९१ मधील तरतुदीप्रमाणे समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून विकास करण्यात आला आहे. सदर बांधकामाच्या जागेवरील ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करून महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे प्रमाणपत्र घेणेबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास बंधनकारक केले आहे. त्यामुळे सदरचे बांधकामे ही नियमाप्रमाणेच असल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत लॉकडाऊनच्या काळात नागरीकांच्या बँकेतील ठेवीवर सायबर गुन्ह्याव्दारे होणारी आर्थिक फसवणूक रोखण्याबाबत

**(८) ३२०९ (२९-०५-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.निलय नाईक : तारांकित प्रश्न क्रमांक ६४९ ला दिनांक १२ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत लॉकडाऊनमुळे आर्थिक उत्पन्न बंद असताना बँकेतील ठेवीवर सायबर गुन्हेगारांच्या घटना वाढत असून अनेकांची आर्थिक फसवणूक झाल्याचे दिनांक ६ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ऑनलाईन फसवणुकीचे प्रमाण वाढत असल्याने याप्रकरणी त्यांचेवर कोणते गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, या सायबर गुन्हेगारांना अटक करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईतील लॉकडाऊनच्या काळात नागरीकांच्या बँकेतील ठेवीवर सायबर गुन्ह्याव्दारे होणारी आर्थिक फसवणूक रोखण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२५-०६-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

फसवणुकीच्या सायबर गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आली असून, प्राप्त फिर्यादीनुसार भारतीय दंड विधान आणि माहिती व तंत्रज्ञान अधिनियम २००८ या कायद्यांतर्गतच्या कलमांन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. घडलेल्या गुन्ह्यांपैकी मुंबईमध्ये १६ जणांना अटक करण्यात आली आहे.

(३) लॉकडाऊनच्या काळात Covid-१९ या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव होत असताना Covid-१९ रोगाच्या माहितीचे किंवा फसवणुकीच्या योजनांचे आमिष दाखवून वेगवेगळ्या फसवणुकीच्या लिंक्स ऑनलाईन समाज माध्यमांवर पाठवून लोकांना फसवले जाऊ शकते अथवा ई-मेलव्दारे, इंटरनेट माध्यमांव्दारे लोकांची आर्थिक फसवणूक होऊ शकते, असा धोका लक्षात घेऊन महाराष्ट्र सायबर कार्यालयाकडून प्रतिबंधात्मक कारवाई करताना विशेष मार्गदर्शिका (Advisory) तयार करून प्रसारित करण्यात आली आहे.

इलेक्ट्रॉनिक मिडिया, सोशल मिडिया आणि दैनंदिन प्रेस नोटच्या माध्यमातून महाराष्ट्र सायबर यांचेकडून जनजागृती करण्यात आली आहे. लॉकडाऊन व कोरोना (Covid-१९) या महामारीच्या काळात ऑनलाईन फसवणुकीच्या सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्याच्या उद्देशाने नागरिकांना मार्गदर्शन करून सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

फिशिंग, डेबिट/क्रेडिट कार्ड फ्रॉड, जॉब फ्रॉड, फेक वेबसाईट्स, ऑनलाईन शिक्षण, रॅन्समवेयर, मालवेयर, स्किमिंग अॅटॅक्स, टिकटॉक, अॅमेझॉन, ट्विटर, व्हॉट्सअॅप अशा विविध सायबर माध्यमातून वापरकर्ते सायबर विषयक गुन्ह्यांना बळी पडू शकतात म्हणून अशा विविध विषयांसंबंधी विशेष मार्गदर्शिका (अॅड्व्हायझरी) महाराष्ट्र सायबर कार्यालयाकडून समाज माध्यमातून सोशल मिडिया आणि प्रेस नोटव्दारे प्रसारित करून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली आहे.

(४) घडलेल्या गुन्ह्यांची दखल घेतली असल्यामुळे विलंब झालेला नाही.

---

## पाडळी (जि.औरंगाबाद) येथील प्राथमिक शाळेत शिक्षकांची भरती करण्याबाबत

**(९) ३३४२ (२९-०५-२०२०). श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाडळी (जि.औरंगाबाद) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत ६ शिक्षकांची पदे मंजूर असताना तेथे तीन शिक्षक कार्यरत असल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाडळी येथे वर्ग १ ली ते ७ वी पर्यंत एकूण १४२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षकांची भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०१-०६-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषद, औरंगाबाद अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाडळी केंद्र सावंगी बाजार, ता.खुलताबाद या शाळेत एकूण ६ शिक्षकांची पदे मंजूर असून सर्व पदे भरलेली आहेत. माहे फेब्रुवारी व मार्च, २०२० या कालावधीत सदर शाळेतील दोन शिक्षकांची नेमणूक माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेसाठी दिनांक १८/०२/२०२० ते २३/०३/२०२० या कालावधीसाठी केली होती. संबंधित शिक्षक परीक्षेच्या काळात सहायक परीक्षक म्हणून कार्यरत होते व परीक्षा नसेल त्यादिवशी शाळेत कार्यरत होते. तसेच सदर शाळेतील अन्य एक शिक्षिका दिनांक १४/०२/२०२० ते २९/०३/२०२० या कालावधीत बालसंगोपन रजेवर होत्या. तथापि, बालसंगोपन रजा कालावधी संपल्यानंतर संबंधित शिक्षिका हया दिनांक ३०/०३/२०२० रोजी नियमित शाळेवर रूजू झाल्या आहेत.

सद्य:स्थितीत सदर शाळेवर शिक्षकांचे कुठलेही पद रिक्त नाही.

(२) होय.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयातील खाजगी रुग्णालयात मोफत उपचार होत नसल्याबाबत

**(१०) ३३५४ (२९-०५-२०२०). श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव झालेल्या रुग्णांवर खाजगी रुग्णालयात मोफत उपचार होईल असे शासनाने जाहीर केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औरंगाबाद जिल्ह्यातील खाजगी रुग्णालयात मोफत उपचार होत नसल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२४-०५-२०२१) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

महात्मा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत येणाऱ्या अंगिकृत खाजगी रुग्णालयांमध्ये २० पॅकेजेस अंतर्गत कोविड-१९ आजारासाठी उपचाराची मोफत सुविधा दिनांक २३ मे, २०२० च्या शासन निर्णयानुसार उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
(२) हे खरे नाही. औरंगाबाद जिल्ह्यात २० पॅकेजेस अंतर्गत माहे मे, २०२० मध्ये एकूण ९ रुग्णांना खाजगी अंगिकृत रुग्णालयांमध्ये उपचार झाले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा परिषद शिक्षकांच्या नियमबाह्य आंतरजिल्हा बदल्यांबाबत

**(११) ३३५६ (२९-०५-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषद शिक्षकांच्या नियमबाह्य आंतरजिल्हा बदल्या माहे ऑगस्ट, २०११ ते माहे मार्च, २०१३ या कालावधीत करण्यात आल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ७४ शिक्षकांच्या नियमबाह्य बदल्यांसाठी तीन शिक्षणाधिकाऱ्यांसह एका अधीक्षकाची खातेनिहाय चौकशी सुरु करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागीय आयुक्तांचे आंतरजिल्हा बदली करु नये असे आदेश असतानाही ८० पेक्षा अधिक शिक्षकांना रुजू करुन घेण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०१-०६-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
सदरची बाब जिल्हा परिषद, अकोला कार्यालयाशी संबंधित आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) आंतरजिल्हा बदलीव्दारे जिल्हा परिषद अकोला येथे ८० शिक्षक रूजु झाले.
(४) सदर प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली आहे व संबंधितावर खातेनिहाय चौकशीची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इतर राज्यातील कामगारांनी स्वगावी जाण्याकरीता आंदोलन केल्याबाबत

**(१२) ३३८९ (५-०६-२०२०). डॉ.परिणय फुके, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर शासकीय वैद्यकिय महाविद्यालय बांधकामाच्या कामाकरीता छत्तीसगड, उत्तरप्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, ओडीसा व झारंखड येथील १५०० कामगारांनी स्वगावी जाण्याकरीता चंद्रपूर हैद्राबाद महामार्गावर आंदोलन केल्याचे दिनांक ३ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परप्रांतियांना त्याच्या कामाची थकीत रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून दिली गेली नसल्यामुळे परप्रांतियामध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित परप्रांतियांना स्वगृही पोहचविण्यासाठी कोणती विशेष व्यवस्था केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१७-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. शापुरजी पालनजी कं.प्रा.लि., जि.पुणे या कंपनीच्या प्रतिनिधीसोबत तहसिलदार, चंद्रपूर यांना सदर कंपनीच्या मजूरांचे माहे मार्च, २०२० पर्यंतचे वेतन अदा करण्यात आले असून सदर घटनेच्या दिवसापर्यंत मजूरांचे वेतन कंपनीच्या नियमानुसार विनाविलंब ८ दिवसांचे आत त्यांच्या खात्यात जमा करण्याच्या सूचना तहसिलदार, चंद्रपूर यांनी दिलेल्या आहेत तसेच कोणत्याही मजूरांचे वेतन कोणत्याही ठेकेदाराकडे देवू नये अशा सूचना देण्यात आल्या असून ही बाब कंपनीने मान्य केली आहे.
(३) उपरोक्त प्रकरणी तहसिलदार, चंद्रपूर यांनी कंपनी व्यवस्थापनेला दिलेल्या निर्देशानुसार त्याची पुर्तता करुन संबंधित राज्य प्रशासकीय परवानगी प्रक्रिया पूर्ण झालेल्या बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश व झारखंड मधील एकूण ४११ कामगार यांना त्यांचे स्वग्रामास पोहचविण्याची व्यवस्था केली आहे. तसेच राज्य प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण न होऊ शकलेल्या आसाम, छत्तीसगढ, दिल्ली, पंजाब, राजस्थान, पश्चिम बंगाल, मध्यप्रदेश व झारखंड येथील ४९२ कामगार हे स्वत:ची व्यवस्था करुन स्वग्रामी गेले तसेच १८६ कामगार हे कंपनीमध्येच राहिले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद येथील प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेतील तंत्रज्ञांची पदे भरण्याबाबत

**(१३) ३५२३ (०२-०६-२०२०). श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेत (फॉरेन्सिक लॅब) सुरु करण्यासाठी गृह खात्याने सायबर व्हॉईस मटेरियल, अमेरिकेचे अद्ययावत इन-केस सॉफ्टवेअर, क्लॉऊड कॉम्प्युटींगसह इतर आवश्यक यंत्रसामग्री या लॅबला उपलब्ध करुन देण्यात आली असूनही यंत्रसामुग्री चालविण्यास कुशल तंत्रज्ञ नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तंत्रज्ञांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (११-०५-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही. प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, औरंगाबाद येथे संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण विभागात वैज्ञानिक सहायक दर्जाचे तंत्रज्ञ उपलब्ध आहेत. सदर कर्मचारी प्रकरणे विश्लेषित करीत असून सदर प्रकरणे प्रतिवेदित करण्यासाठी मुंबई प्रयोगशाळेतील अधिकाऱ्यांच्या मार्फतीने प्रतिवेदित करण्यात येत आहेत. औरंगाबाद प्रयोगशाळेतील रिक्त पदांची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

तसेच, संचालनालयातील संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण विभागासाठी कुशल तंत्रज्ञ उपलब्ध होण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वैज्ञानिक अधिकारी गट-ब या संवर्गाच्या एकूण ४३ रिक्त पदांची जाहिरात दिनांक १५/१०/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली असून त्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मूलभूत सुविधा व रोजगारसंधी ग्रामपंचायतस्तरावर उपलब्ध करण्यासाठी घालण्यात आलेल्या लोकसंख्या निकषाबाबत

**(१४) ३६०६ (२९-०५-२०२०). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मूलभूत सुविधा व रोजगारसंधी ग्रामपंचायतस्तरावर उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामपंचायतींचा सर्वांगीण विकास करण्याचा उद्देश समोर ठेवून जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ५ हजारपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीला नागरी सुविधा पुरविण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्ह्यामध्ये ८२४ ग्रामपंचायतींपैकी ३८ ग्रामपंचायतींची लोकसंख्या ही ५ हजारापेक्षा अधिक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लोकसंख्येच्या निकषामुळे जिल्ह्यातील अन्य ग्रामपंचायतींचा या योजनेमार्फत विकास होत नसल्यामुळे सदर ग्रामपंचायतींना विकास कामांपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने लोकसंख्येच्या निकषात शिथिलता आणण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२२-०६-२०२१) :** (१), (२), (३) व (४) दिनांक १६ सप्टेंबर, २०१० च्या शासन निर्णयानुसार ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मोठ्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधांसाठी विशेष अनुदान (विद्युतीकरणासह) ही योजना राबविण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये एकूण ८१० ग्रामपंचायती असून ५४ ग्रामपंचायतीची लोकसंख्या ही ५ हजारापेक्षा अधिक आहे.

ज्या ग्रामपंचायतींची लोकसंख्या ५ हजारपेक्षा कमी आहे अशा ग्रामपंचायतींकरीता जिल्हा वार्षिक योजनेतून व शासनाकडील मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या मूलभूत सुविधा तसेच जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नाच्या निधीमधून विकास कामे मंजूर केली जातात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात टोमॅटोच्या पिकाला तिरंगा विषाणूचा संसर्ग झाल्याची खोटी बातमी वृत्तवाहिनीवरून प्रसारित करण्यात आल्याबाबत

**(१५) ३६७८ (०३-०६-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात टोमॅटोच्या पिकाला कोरोना पेक्षाही भयंकर अशा तिरंगा विषाणूचा संसर्ग झाला असल्याची खोटी बातमी कुठेही सत्य व तथ्य न तपासता एका वृत्तवाहिनीने प्रसारित केल्याचे माहे मे, २०२० च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कथित विषाणू संदर्भात कृषी खाते व कृषी तज्ञांचा कुठलाही अभिप्राय न घेता सोशल मिडियावरून सदर बातमी पसरल्यामुळे परिणामतः टोमॅटो पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होवून टोमॅटो उत्पादक शेतकरी अडचणीत आला असून सदर वृत्तवाहिनी विरोधात शेतकऱ्यांनी अनेक तक्रारी दाखल केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अशा खोट्या बातम्या प्रसारित करणाऱ्या दोषी वृत्तवाहिनी विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच भविष्यकाळात अशा खोट्या बातम्या प्रसारीत करणाऱ्या वृत्तवाहिन्यांना आळा घालण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१८-०५-२०२१) :** (१), (२) व (३) टोमॅटो पिकावरील नवीन तिरंगा विषाणूजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे टोमॅटो उत्पादक शेतकरी त्रस्त असल्याची बातमी टिव्ही-९ या मराठी वृत्तवाहिनीवर दिनांक १५ मे, २०२० रोजी प्रसारित झाली. खाजगी दुरचित्रवाहिनी व केबल नेटवर्क यावर प्रसारित होणारे कार्यक्रम संहितेनुसार होतात किंवा नाही यावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारच्या केबल टेलिव्हीजन नेटवर्क व रेग्युॅलेशन ॲक्ट १९९५ मधील तरतुदीनुसार गठीत राज्यस्तरीय संनियंत्रण समितीमार्फत अशा बाबीं केंद्रीय नभोवाणी व प्रसारण मंत्रालयाकडे पाठविण्याची तरतुद आहे.

या विषयी राज्यस्तरीय संनियंत्रण समितीच्या दिनांक १० सप्टेंबर, २०२० रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, कृषी आयुक्तालय, पुणे यांच्याकडील दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या अहवालानुसार उक्त बातमी विषयीच्या विविध प्रश्नांचे/शकांचे निराकरण करण्यात आले असून, सदर बातमी टिव्ही-९ या मराठी वृत्तवाहिनीने मागे घेतल्याचे नमुद केले आहे. सदर बातमी एक अफवा असून टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांनी त्यावर विश्वास ठेऊ नये तसेच ही बातमी निराधार असल्याने टिव्ही-९ या मराठी वृत्तवाहिनीने सदर बातमी मागे घेतली आहे. याबाबतची प्रसिध्दी विविध वृत्तपत्रामधून/वृत्तवाहिन्यावरून विनामुल्य देण्याबाबत अधिपरिक्षण पुस्तके व प्रकाशने कार्यालय, मुंबई यांनी सर्व प्रसिध्दी माध्यमांना दिनांक २९ सप्टेंबर, २०२० रोजी G-mail व्दारे विनंती केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वांद्रे-वर्सोवा सी-लिंकच्या कास्टिंग यार्डच्या कामाबाबत

**(१६) ३९०० (१४-०९-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे-वर्सोवा सी-लिंकच्या कास्टिंग यार्डच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(२) तसेच उक्त प्रकल्पाचे कामास प्रत्यक्षात कधीपासून सुरुवात करण्यात येणार आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०६-२०२१) :** (१) वर्सोवा-वांद्रे सेतूच्या प्रकल्पाकरीता पर्यायी कास्टिंग यार्डसाठीची जागा माहे मे, २०२० च्या ई-निविदेव्दारे भाड्याने घेण्यात आली असून कास्टिंग यार्ड विकसित करण्यासाठी ते ईपीसी कंत्राटदाराला ती देण्यात आली आहे. सदर काम प्रगतीपथावर आहे.

(२) वर्सोवा-वांद्रे सागरी सेतूच्या प्रकल्पांच्या कामास सुरूवात करण्यात आली असून कामाची भौगोलिक प्रगती-१.७५६% इतकी आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मायक्रोफायनान्स कंपन्यांकडून शेतकरी व बचत गटांनी घेतलेल्या कर्जाच्या वसूलीबाबत

**(१७) ४०६८ (३०-०७-२०२०). श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मोठ्या प्रमाणात फायनान्स कंपन्या कार्यरत असून त्यातील उत्कर्ष फायनान्स, भारतीय समृध्दी फायनान्स, महिंद्रा फायनान्स, श्रीराम सिटी फायनान्स यासारखे मायक्रोफायनान्स कंपन्यांकडून शेतकरी व बचत गटांनी घेतलेल्या कर्जाच्या वसूलीसाठी व कर्जाचा हप्ता भरण्यासाठी धमक्या देण्यात येत असल्याचे दिनांक १६ जून, २०२० रोजी वा त्यासमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात कोरोनासारखे महामारीचे संकट उद्भवल्याने लोकांच्या हातातली कामे ३ महिने बंद असल्याने आर्थिक अडचण लक्षात घेता रिझर्व्ह बँकेव्दारे लॉकडाऊन काळात कर्जाच्या हप्त्यात ६ महिन्यांची मुदत वाढ देवूनही मायक्रोफायनान्स कंपन्यांकडून कर्जदाराना धमक्या व वस्तूची उचल करण्याचा प्रकार राज्यात घडत असल्याने अशा मायक्रोफायनान्स कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२४-०५-२०२१) :** (१) फायनान्स कंपन्यांकडून कर्जदारांना कर्ज वसूलीसाठी तगादा लावून धमकावण्यासंदर्भात तीन घटना राज्यात निदर्शनास आल्या आहेत.

अ) यवतमाळ जिल्ह्यात घाटंजी येथे १ गुन्हा नोंद आहे. इंस्टंट फायनान्स कंपनी, यवतमाळ कडून कर्जावर घेतलेले टॅक्ट्रचे हप्ते थकीत झाल्याने दिनांक २/०३/२०२० रोजी सदर बँकेचे वसूली

अधिकारी याने ट्रॅक्टर घेवून गेल्याने महिला शेतकरी यांनी विचारणा केली असता वसूली अधिकाऱ्याने तिला शिवीगाळ करुन त्या महिला शेतकऱ्याचे हात पकडून विनयभंग केला.

ब) वाशिम येथील प्रकरण सन २०१८ मधील आहे. पोलीस स्टेशन, शिरपूर येथे अप.क्र.१४३/२०१८ मध्ये महिंद्रा फायनान्स या कंपनीच्या एंजटविरुध्द कलम ३०६ भादंवि अन्वये गुन्हा दाखल आहे.

क) नागपूर ग्रामिण येथे सन २०१७ मध्ये पोलीस स्टेशन बोरी येथे अदखलपात्र गुन्हा क्र. ६९/१७ कलम ५०६ भांदवि अन्वये नोंद आहे. सदर प्रकरणी इस्त क्र. १०/२०१७ कलम १०७, ११६ (३) जाफौ दिनांक १३/०२/२०१७ रोजी यातील आरोपीविरुध्द प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(२) लघुवित्त कंपन्यांकडून दिलेल्या कर्जाची वसुली करतांना कंपन्यांकडून धमक्या देणे वा जबरदस्तीने कर्जवसुली करण्याचा प्रकार निदर्शनास आल्यास अशा कंपन्याविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांना उपचारासाठी रुग्णालय, आरोग्य विमा तसेच मृत्यू ओढावल्यास कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(१८) ४१८३ (१५-०७-२०२०). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सुरक्षा बलाचे सुमारे नऊ हजार जवान कंत्राटी पध्दतीवर काम करीत असून कोरोना आणि टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सुमारे १६२ संवेदनशील ठिकाणच्या सुरक्षेची जबाबदारी त्यांच्यावर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाबाधित रुग्णालयांमध्ये देखील हे जवान जीव धोक्यात घालून काम करीत असून मुंबई व पुण्यात अनेक जवानांना कोरोनाची लागणही झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्याच्या आपत्कालीन परिस्थितीत केवळ प्रवास भत्ता वगळता कोणत्याच सुविधा जवानांना मिळत नसल्याने जवानांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पोलीस आणि महापालिका कर्मचाऱ्यांप्रमाणे या जवानांना कोरोनाची लागण झाल्यास उपचारासाठी रुग्णालय, आरोग्य विमा तसेच मृत्यू ओढवल्यास कुटुंबियांना आर्थिक भरपाई देण्याबाबत शासनाकडून कोणता निर्णय घेण्यात आला आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोरोना व टाळेबंदीच्या काळात महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांना उपचारासाठी रुग्णालय, आरोग्य विमा तसेच मृत्यू ओढवल्यास कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२५-०६-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे. दिनांक २२/०७/२०२० पावेतो विविध ठिकाणी कार्यरत असलेल्या एकूण ९९३३ पैकी २७५ जवानांना कोरोनाची लागण झाली असून त्यापैकी २४७ जवान कोरोना मुक्त झाले आहेत. तर २८ जवान रुग्णालयामध्ये उपचार घेत आहेत.
(३) हे खरे नाही.

कोरोना आजाराच्या पार्श्वभुमीवर जवानांना विविध सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

१) अतिसंवेदनशील ठिकाणी उदा. हॉस्पिटल्स, डंपिंग ग्राऊंड इ. आस्थापनेवरील कार्यरत जवानांना त्यांच्या वैद्यकीय गरजाची पुर्तता होणेकामी वैद्यकीय भत्ता रुपये १०००/- दरमहा देण्यात येत आहे.
२) कर्तव्याच्या ठिकाणी हजर राहण्यासाठी सर्व जवानांना रुपये १०००/- प्रवासभत्ता देण्यात येत आहे.
३) आर्थिक अडचणीत असलेल्या व लॉकडाऊनमुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेअभावी रजेवरुन कर्तव्य ठिकाणी येऊ न शकलेल्या जवानांना बिनव्याजी व रिफंडेबल रुपये १०,०००/- याप्रमाणे एकूण २३९ जवानांना एकूण रक्कम रुपये २३,९०,०००/- देण्यात आलेली आहे.

४) संवेदनशील ठिकाणी कार्यरत जवानांना मास्क्स, सॅनिटायझरस, हॅंड ग्लोव्हज, फेस शिल्ड इ. (Protective Gears) उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.
५) कोरोना संसर्ग होऊ नये म्हणून प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी आर्सेनिक अल्बम-३० आणि जीवनसत्व क युक्त गोळ्या जवानांना देण्यात आलेल्या आहेत.
६) लॉकडाऊन कालावधीतही जवानांना मार्च, एप्रिल, मे आणि जून या महिन्यांचे वेतन वेळेवर देण्यात आलेले आहे.

(४) कोरोना संसर्ग होऊन रुग्णालयात उपचारार्थ दाखल जवानांना तातडीची वैद्यकीय गरज आणि योग्य आहार यासाठी रुपये ३०००/- साह्य त्वरीत दिले जात आहे.

राज्य कामगार विमा योजनेंतर्गत (ESIC) जवानांना मोफत औषधोपचार सुविधा उपलब्ध आहे.

कर्तव्यावर असताना जवानांना कोरोना संसर्ग झाल्यास व दुर्देवाने त्यात त्यांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक सहाय्य महामंडळाकडून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

(५) कोरोना व टाळेबंदीच्या काळात महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांना उपचारासाठी रुग्णालय, आरोग्य विमा तसेच मृत्यू ओढावल्यास कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माय ऑन एनर्जी कंपनीने नागरिकांची फसवणूक केल्याबाबत

**(१९) ४५०७ (१५-०७-२०२०). श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१८-२०१९ मध्ये बायोडिझेल पंप एजन्सी देण्याच्या नावाने माय ऑन एनर्जी या कंपनीने सांगली ते नागपूर दरम्यानच्या सुमारे १६८ नागरिकांना प्रत्येकी रुपये १५ लाख असा करोडो रुपयांना फसविल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीने प्रभादेवी (मुंबई) येथे कार्यालय उघडून त्या कार्यालयातून अनेक गरजूंना सदर बायोडिझेल पंपाची एजन्सी घेण्याबद्दल एक दिवसाचे शिबिर घेऊन विविध मार्गदर्शन केले होते, सदरहू कंपनीचे कार्यालय बंद असून मालक कुठे सापडत नाही, यासाठी फसवणूक झालेल्या १६८ जणांपैकी ४१ जणांनी एकत्र येऊन सदर कंपनीविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरिकांची फसवणूक करणाऱ्या सदर कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१५-०६-२०२१) :** (१), (२) व (३) राज्यात सन २०१८-२०१९ मध्ये माय ऑन एनर्जी कंपनीने रिटेलशिप देण्यासाठी इन डिझेल कंपनीचे बायोडिझेल विक्रीकरीता खोटे लेटर ऑफ इंन्डेंट तयार करुन, बनावट कागदपत्रावर सह्या घेऊन बायोडिझेल पंप टाकून देण्यासाठी सदर कंपनीने गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांची फसवणूक केली म्हणून पोलीस अधीक्षक, जालना, बुलढाणा, नंदुरबार, कोल्हापूर व पोलीस आयुक्त, मुंबई (दादर पोलीस स्टेशन) या ठिकाणी प्रत्येकी १ अशा एकूण ५ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या प्रकरणात आतापर्यंत एकूण ९ नागरीकांना फसविल्याचे निष्पन झालेले आहे.

वरील तक्रारीच्या अनुषंगाने खालील ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत :-

१) पोलीस अधीक्षक, जालना यांचे कार्यक्षेत्रातील, पोलीस ठाणे, परतूर येथे दिनांक ३०/०८/२०१९ रोजी गु.र.क्र. २२०/२०१९, कलम ४०६, ४०९, ४२०, ४६८, ४७१, १२०(ब) ३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल आहे.
२) पोलीस अधीक्षक, नंदुरबार यांचे कार्यक्षेत्रातील, पोलीस ठाणे, शहादा येथे दिनांक १०/०६/२०१९ रोजी गु.र.क्र. २०२/१९, कलम ४०६, ४०८, ४०९, ४२०, ४६७, ४६८, १२०(ब) ३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

३) पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांचे कार्यक्षेत्रातील, पोलीस ठाणे, जळगांव जामोद येथे दिनांक ०३/०९/२०१९ रोजी गु.र.क्र. ५५०/१९, कलम ४०६, ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

४) पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांचे कार्यक्षेत्रातील, पोलीस ठाणे, राधानगरी येथे दिनांक १९/०९/२०१९ रोजी गु.र.क्र. १५८/१९, कलम ४०६, ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मुंबई यांनी बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात श्री.नितीन राजे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अर्जाच्या चौकशीअंती प्रकरण दिवाणी स्वरुपाचे असल्याचे अर्जदारास कळविण्यात आले होते. त्यामुळे या प्रकरणी गुन्हा दाखल केल्याचे दिसून येत नाही. त्यानंतर अर्जदार यांनी मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.१३०६/२०१९ दाखल केले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

तसेच पोलीस ठाणे परतूर येथील गु.र.क्र. २२०/२०१९ या गुन्ह्यातील फिर्यादी प्रशांत राखे, रा.परतूर व माय ऑन एनर्जी कंपनी यांच्यामध्ये करार होऊन करारानुसार १५ लाख रुपये अनामत रक्कम म्हणून दिली होती. परंतु फिर्यादी याने बायोडिझेल पंपासाठी जागा उपलब्ध करुन न दिल्याने व माय ऑन एनर्जी कंपनीच्या शर्ती व अटींचे फिर्यादीने पालन केलेले नसून फिर्यादीने आरोपी यांना दिलेले १५ लाख रुपये मिळण्यासाठी मा.न्यायालयात दावा दाखल केल्याचे तपास अधिकारी यांना तपासात निष्पन्न झाल्याने त्यांनी सदर गुन्हयात दिनांक ०१/०६/२०२० रोजी मा.न्यायालयात क फायनल समरी पाठविलेली आहे.

पोलीस स्टेशन, शहादा गु.र.क्र. २०२/१९, पोलीस स्टेशन जळगांव जामोद गु.र.क्र. ५५०/१९ व पोलीस स्टेशन राधानगरी गु.र.क्र.१५८/१९ हे तिन्ही गुन्हे तपासावर आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## बोईसर-तारापूर औद्योगिक क्षेत्रात (जि.पालघर) कंपन्यांकडून प्रदूषण होत असल्याबाबत

**(२०) ४५५५ (१५-०७-२०२०). श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर-तारापूर औद्योगिक क्षेत्रात (जि.पालघर) कंपन्यांकडून प्रदूषण होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत मा.पर्यावरण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २० फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रदूषण रोखण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०२-०६-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर बैठकीमध्ये मा.मंत्री (पर्यावरण) यांनी दिलेल्या निर्देशानूसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत तारापूर औद्योगिक क्षेत्रातील एकूण ३९ उद्योगांपैकी दोषी आढळून आलेल्या १२ उद्योगांवर उत्पादन बंदचे आदेश, ५ कारखान्यांना कारणे दाखवा नोटीस, ५ कारखान्यांना प्रस्तावित आदेश बजावण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे कशेळी (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील जमीन प्रकरण निकाली काढण्याबाबत

**(२१) ४७८२ (१४-०९-२०२०). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कशेळी (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील सर्व्हे क्र. ४८ या जमिनीबाबत तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण कार्यालयात केस नं. ४/१४ (७०ब) साठी गेली पंधरा वर्ष तत्कालीन सहा तहसिलदारांनी गैरव्यवहाराच्या उद्देशाने प्रकरण प्रलंबित ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण कार्यालयात चार वेळा जाबजबाब घेऊनही अद्याप पर्यंत सुनावणी घेऊन अंतिम निर्णय देण्यासाठी संबंधित अधिकारी हे टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.लहू कृष्णा म्हात्रे व त्यांचे पूर्वज हे शेतकरी कुटुंब सन १९४५ पासून सदर जमिनीवर शेती करत असल्याने त्यांना महसूल अधिनियम कुळ कायदा ७० ब या तरतुदीनुसार आदेश पारित करणेकामी कलम २(१७)(१८) कलम ४ च्या तरतुदींनुसार कुळ जाहीर करणेसाठी शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मौजे कशेळी येथील जमीन प्रकरण अनेक वर्षे प्रलंबित ठेवणाऱ्या दोषींवर कारवाई करुन सदरहू प्रकरण लवकर निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२२-०६-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) अर्जदार यांनी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ७० ब अन्वये कुळ जाहीर करण्यासाठी दिनांक १९/१०/२००७ रोजी दाखल केलेला दावा तहसिलदार, भिवंडी यांनी दिनांक ३०/०६/२००९ अन्वये अमान्य केला असून त्याविरुध्द दाखल केलेले अपील उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांनी दिनांक १४/०२/२०१४ च्या आदेशान्वये अंशत: मान्य करुन प्रकरण फेरचौकशीसाठी पाठविले. त्यानुषंगाने तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण, भिवंडी यांनी अर्जदाराचा दावा दिनांक ०१/०२/२०२१ च्या आदेशान्वये अमान्य केला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात एकात्मिक सर्व समावेशक विकास नियंत्रण नियमावली लागू करण्याबाबत

**(२२) ४९५२ (१४-१२-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.महादेव जानकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संपूर्ण राज्यासाठी एकात्मिक सर्व समावेशक विकास नियंत्रण नियमावलीचे प्रारूप शासनाने सन २०१९ मध्ये वा त्यादरम्यान राजपत्रात प्रसिध्द केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नियमावलीबाबत हरकती व सूचना प्राप्त होऊन काही महिन्यांचा कालावधी उलटूनही अद्याप अंतिम नियमावली लागू झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बांधकाम क्षेत्र, व्यावसायिक, बांधकाम मजुर यांच्यावर बांधकामे थांबल्यामुळे विपरीत परिणाम होत असल्यामुळे तातडीने उक्त नियमावली अंतिम करून ती कधीपर्यंत लागू करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०६-२०२१)** : (१) होय, हे खरे आहे. सदर प्रारुप नियमावली दिनांक ०९/०३/२०१९ रोजी सूचना/हरकतीसाठी राजपत्रात प्रसिध्द केली होती.

(२) हे खरे नाही.

राज्य शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिका व अन्य काही विशिष्ट नियोजन प्राधिकरणे वगळता राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा, इतर नियोजन प्राधिकरणे तसेच प्रादेशिक योजना क्षेत्रासाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (Unified DCPR) म.प्रा.नि व न.र

अधिनियम, १९६६ मधील तरतुदींनुसार शासन अधिसूचना क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८ वि.यो व प्रा.यो./कलम (१कक)(ग) व कलम २०(४)/नवि-१३, दिनांक ०२/१२/२०२० अन्वये अंतिम मंजूरी देऊन ती दिनांक ०३/१२/२०२० पासून लागू करण्यात आली आहे.
(३) शासनाने दिनांक ०२/१२/२०२० रोजी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर केली असून सदर नियमावली दिनांक ०३/१२/२०२० पासून लागू झाल्यामुळे बांधकाम व्यवसायाच्या क्षेत्रावर परिणाम होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) शासनाने दिनांक ०२/१२/२०२० रोजी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर केली असून सदर नियमावली दिनांक ०३/१२/२०२० पासून लागू झाली आहे त्यामुळे चौकशी करण्याचा किंवा कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) विलंब झालेला नाही.

---

## शासकीय दंत महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे उपयोगी साहित्य उपलब्ध नसल्याबाबत

**(२३) ४९६३ (१७-११-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना व्हायरसच्या संसर्ग काळात नागपूर येथील शासकीय दंत महाविद्यालय व रूग्णालयात उपयोगी असलेले साहित्य उपलब्ध नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विभागात गेल्या अनेक महिन्यांपासून हातमोजे, दात कापन्याचे सर्जिकल ब्लेड, भुलीचे औषध व अनेक साहित्य नसल्यामुळे बाहेरून आणुन ते उपलब्ध केल्यास रूग्णांवर उपचार केले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, त्याबाबत दंत प्रशासनाकडून साहित्य संपल्याची सूचनाही देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासकीय दंत महाविद्यालय व रूग्णालयात साहित्य उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (०८-०६-२०२१)** : (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) लागू नाही.

---

## आगाशी, कामण, पारोळ व भाताणे (ता.वसई, जि.पालघर) या चार प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरवस्था झाल्याबाबत

**(२४) ४९८६ (२३-११-२०२०). श्री.प्रसाद लाड, श्री.रविंद्र फाटक : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक ४५४५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आगाशी, कामण, पारोळ व भाताणे (ता.वसई, जि.पालघर) जिल्हा परिषदेंतर्गत असलेल्या ५० वर्षापूर्वी बांधलेल्या चार प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारती जीर्ण होऊन मोडकळीस आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चारही प्राथमिक आरोग्य केंद्रात बालरोगतज्ञ, स्त्रीरोगतज्ञ, भुलतज्ञ तसेच इतर वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी त्याचप्रमाणे (सोनोग्राफी मशीन, एक्सरे मशीन, डायलेसीस केंद्र) इत्यादी सोई सुविधांचा अभाव आणि औषधांचा तुटवडा असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या चारही प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी वसई तालुक्यातील एका राजकीय पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्याने दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आगाशी, कामण, पारोळ व भाताणे या चारही प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०८-०३-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. शासनाच्या निकषाप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी बालरोगतज्ञ, स्त्रीरोगतज्ञ, भुलतज्ञ ही पदे मंजूर नाहीत. तसेच सोनोग्राफी मशीन, एक्सरे मशीन, डायलेसीस केंद्र ह्या सुविधा उपलब्ध नसतात. बिगर आदिवासी प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकिय अधिकारी गट-अ २ पदे मंजूर आहेत व आदिवासी प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकिय अधिकारी गट-अ चे १ पद व वैद्यकिय अधिकारी गट-ब चे १ पद अशी २ पदे मंजूर आहे.
(३) सद्य:स्थितीत निवेदन आढळून येत नसून निवेदनाचा शोध सुरू आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

सदर प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असून सदर चारही प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत शासनाच्या निकषाप्रमाणे अपेक्षित आरोग्य विषयक सुविधा जनतेस पुरविण्यात येतात.

---

## नागपूर शहरातील खाजगी रुग्णालयामार्फत कोविड रूग्णांकडून जादा देयक आकारण्यात येत असल्याबाबत

**(२५) ५०४० (१७-११-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.महादेव जानकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.प. ३ (३२)

(१) राज्यात खाजगी रुग्णालये कोरोना रुग्णांकडून उपचाराचे अतिरिक्त देयके आकारीत असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त असून नागपूर शहरात खाजगी रुग्णालयामध्ये रूग्णांना व्हेंटीलेटर न लावताही देयक आकारण्यात आल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिरिक्त आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्याकडे याबाबत मृत रूग्णाच्या नातेवाईकांनी तक्रार केली असता कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नसून शासनाने खाजगी रूग्णालयात उपचार घेणाऱ्या कोरोना बाधितांसाठी उपचाराचे दर निश्चित केले असून शासकीय दरानुसार सामान्य वॉर्डातील पीपीई कीट्सचा खर्च रूपये ६००/- तर आयसीयूचा खर्च रूपये १२००/- असताना ५ दिवसाचे रूपये ३३ हजार शुल्क आकारण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अतिरिक्त दर आकारणाऱ्या रूग्णालयांच्या खर्चाचे ऑडीट व तपासणी करण्याबाबत मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी राज्यातील महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकारी यांना सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान आदेशित केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने अतिरिक्त देयके आकारणाऱ्या खाजगी रुग्णालयांवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक समिती नेमली असून समितीने केलेल्या कार्यवाहीचा तपशिल काय आहे,

(५) असल्यास, नागपूरसह, परभणी, मराठवाड्यातील व राज्यातील इतर जिल्हयांमधील खाजगी रूग्णालयांची तपासणी करुन अतिरिक्त देयके आकारणाऱ्या किती रुग्णालयांवर कारवाई केली याबाबतची जिल्हानिहाय माहिती काय आहे,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने अतिरिक्त देयके आकारणाऱ्या खाजगी रुग्णालयावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२४-०५-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अतिरिक्त आयुक्त, मनपा नागपूर यांच्याकडे मृत रुग्णांच्या नातेवाईकांनी केलेल्या तक्रारींवर कार्यवाही करण्यात आलेली असून संबंधित देयकातील अतिरिक्त शुल्क रुपये २०,४००/- संबंधित तक्रारकर्ते यांना परत करण्याचे नागपूर महानगरपालिकेने दिनांक ०६/११/२०२० रोजीच्या पत्रान्वये आदेशित केलेले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) शासनाने अतिरिक्त देयके आकारणाऱ्या खाजगी रुग्णालयांवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा/महानगरपालिका स्तरावर समिती गठीत करण्याकरीता शासन निर्णय दिनांक ३१/०८/२०२० अन्वये निर्णय घेतला आहे.

(५) नागपूर विभागात समर्पित कोविड रुग्णालयातील रुग्णांच्या देयकाचे प्री-ऑडीट करण्यात आले आहे. त्यामध्ये दिनांक ३/१२/२०२० पर्यंत ७७५ देयकांत तफावत आढळून आलेली आहे. सदर तफावतीतील रुपये ८१,७०,३९५/- इतकी रक्कम संबंधित रुग्णालयांनी रुग्णांस अदा केलेली आहे.

तसेच दिनांक ३/१२/२०२० पर्यंत इतर विभागातून २१२ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यामध्ये ४४,८७,४४४/- एवढी रक्कम परत करण्याचे आदेश संबंधित रुग्णालयास देण्यात आले आहेत. तत्संबंधी कार्यवाही सुरु आहे.

त्याशिवाय मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यात एकूण ३ खाजगी रुग्णालयात कोरोना बाधित रुग्णावर औषधोपचार दरम्यान अतिरिक्त देयक आकारल्यामुळे जिल्हाधिकारी यांनी संबंधित खाजगी रुग्णालयास नोटीस बजावलेली आहे.

(६) अतिरिक्त देयके आकारणाऱ्या रुग्णालयास जादाचे शुल्क तक्रारदारास परत करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. तथापि, प्रकरण परत्वे अनुषंगिक कार्यवाही करण्यात आली आहे.

---

## परभणी जिल्ह्यातील मुद्रा लोन वाटपाबाबत

**(२६) ५१०५ (२३-११-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात मुद्रा लोन या योजनेतून घेतलेल्या कर्जाचे त्या कामासाठी वापर न करता इतर कामासाठी वापर केल्याने बहुतांशी कर्जाची परतफेड होऊ शकणार नसल्याने जवळपास बँका २०% एनपीएमध्ये गेल्याबाबतची तक्रार परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी जिल्ह्यातील मुद्रा लोन योजनेत राजकीय हितसंबंध व बँकांचे अधिकारी यांच्या हितसंबंधातील व्यक्तींना कर्जाचे वाटप करण्यात आल्याने परतफेडीबाबत प्रत्यक्षात कार्यवाही होत नसल्याने बँका अडचणीत आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुद्रा लोन वाटप, वसूली बँकाचा एनपीए व इतर प्रकरणी जिल्हा उपनिबंधक यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व याबाबत थोडक्यात माहिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (०८-०३-२०२१) :** (१) होय, परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे. बँकिंग हा विषय केंद्रीय सूचीत समाविष्ट आहे. ग्रामीण बँका, राष्ट्रीयकृत व वाणिज्यिक बँका या बँकांची व्यावसायिक ध्येयधोरणे व निती निर्धारण भारतीय रिझर्व्ह बँकेकडून होत असल्याने “राज्य स्तरीय बँकर्स समिती” ही बँका व राज्य शासन यामध्ये दुवा म्हणून काम करते. तथापि, नमूद करण्यात येते की, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी, परभणी यांचे आकडेवारीनुसार व विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी शासनास पाठविलेल्या अहवालानुसार परभणी जिल्ह्यातील मुद्रा अंतर्गत वाटप कर्जातील एनपीए ची टक्केवारी ४.३५% आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) लागू नाही.

---

## औरंगाबाद शहरात अंमली पदार्थांचा पुरवठा व तस्करी करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२७) ५२७६ (१८-११-२०२०). श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात अंमली पदार्थांचा पुरवठा करणाऱ्या दोन तस्करांसह लाखो रुपये किंमतीचे चरस मेफेड्रोन पोलिसांनी जप्त केल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ड्रग तस्करांचे ग्राहक शहरातील महाविद्यालयीन तरुण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने औरंगाबाद शहरात अंमली पदार्थांचा पुरवठा व तस्करी करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२२-०६-२०२१) :** (१) औरंगाबाद येथे दिनांक २९/०९/२०२० रोजी पंचवटी चौक जवळ, रेल्वेस्टेशनकडे २ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून रुपये ५२,०००/- किंमतीचा, १३ ग्रॅम वजनाचा मेफेड्रान हा अंमली पदार्थ तसेच रुपये ११,२००/- किंमतीचा २८ ग्रॅम १०० मिली ग्रॅम वजनाचा चरस हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. नंतर आणखी तीन इसमांचा सदर गुन्ह्यात सहभाग दिसून आल्याने दिनांक ३०/०९/२०२० रोजी त्यांना देखील अटक करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

तपासामध्ये असे निष्पन्न झालेले नाही.

(३) उक्त प्रकरणी एन.डी.पी.एस. कायदा १९८५ कलम ८(C), सह कलम २०(A),२२,२९ गु.र.न. १२३/२०२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींची सध्या जामीनावर सुटका करण्यात आली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

## पुणे येथे प्राध्यापक व प्राचार्य यांच्या प्रशिक्षणासाठी अध्यापक विकास संस्था स्थापन करण्याबाबत

**(२८) ५३८५ (१३-१२-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर होत असलेल्या आधुनिक शिक्षण पध्दतीतील बदल लक्षात घेऊन अध्यापक व प्राचार्य यांच्या प्रशिक्षणासाठी कंपनी कायद्यानुसार पुणे येथे अध्यापक विकास संस्था स्थापन करण्याचा निर्णय दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनाने घेतला असून त्यात राज्य शासनाचा आर्थिक हिस्सा ४० टक्के, विद्यापीठाचा ४० टक्के, तंत्र शिक्षण मंडळाचा ५ टक्के, शैक्षणिक संस्था व उद्योगांचा हिस्सा ५ टक्के, तसेच स्वयंसेवी व संस्थांचा हिस्सा १० टक्के राहणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे स्वरुप व उद्दीष्ट काय आहे, यासाठी एकूण किती निधीची आवश्यकता आहे व निधी कोणत्या अटींवर देण्यात येणार, तसेच उक्त संस्थेवर नियंत्रण ठेवण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच निर्णयाच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.उदय सामंत (०३-०३-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर होत असलेले आधुनिक शिक्षण पध्दतीमधील बदल विचारात घेऊन, विद्यापीठे व उच्च शिक्षण विभागाच्या अधिनस्त शिक्षकीय संवर्गातील अध्यापकांच्या व्यावसायिक क्षमतेचा प्रशिक्षणाव्दारे नियमित विकास करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत “महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था” (Maharashtra State Faculty Development Academy) शासनाच्या दिनांक १३/०९/२०१९ च्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आली आहे. तसेच शासनाच्या दिनांक २०/०२/२०२० च्या शासन निर्णयान्वये सदरची संस्था

कंपनी कायदा, २०१३ मधील कलम-८ अन्वये स्थापन करण्यास व कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. यानुसार मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली एकूण १५ सदस्यांच्या संचालक मंडळाची संरचना करण्यात आली असून संस्थेस शैक्षणिक व वित्तीय स्वायत्तता असणार आहेत. सदर सस्थेसाठी अनावर्ती रुपये ५० कोटी व एकवेळचा निधी म्हणून आवर्ती खर्चासाठी रुपये १० कोटी इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

सद्य:स्थितीत सदर संस्था कार्यान्वित होण्यासाठी शासनाच्या दिनांक १३/०३/२०२० च्या आदेशान्वये प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रूसा) यांच्याकडे संस्थेच्या “कार्यकारी संचालक” पदाचा तर उपसंचालक (लेखा व कोषागार), राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रूसा) यांच्याकडे संस्थेच्या “उप संचालक (वित्त)” या पदाचा कार्यभार देण्यात आलेला आहे. तसेच प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे यांच्याकडे संस्थेचे “जनरल मॅनेजर” पदाचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे

---

## चंद्रपूर जिल्हयातील लघु सिंचन विभागांतर्गत माजी मालगुजार तलावाच्या सीमांकनाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२९) ६०५० (२४-११-२०२०). श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांच्या अखत्यारितील लघु सिंचन विभागांतर्गत माजी मालगुजार तलावाच्या सिमांकनासाठी लागणारे शुल्क शासनाने न भरल्याने सिमांकनाचे काम प्रलंबित असल्याचे दिनांक २३ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर माजी मालगुजार तलावावर अतिक्रमण वाढल्याने सिंचन क्षमता कमी होऊन तलावाचे पुनरूज्जीवन करण्याकरीता सिमांकन करणे आवश्यक असल्याने सिमांकन शुल्क उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (२८-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) चंद्रपूर जिल्ह्यामध्ये एकूण १६७८ माजी मालगुजारी तलावापैकी एकूण ५२० तलावांची दुरुस्ती जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागाकडून हाती घेण्यात आली. त्यापैकी ५०० तलावांची दुरुस्ती कामे पूर्ण करण्यात आली आहेत. पूर्ण करण्यात आलेल्या माजी मालगुजारी तलावांचे पूर्ण संचय पातळीचे सर्वेक्षण करुन Boundary Stone लावण्यात आलेले आहेत.

जिल्ह्यातील सहा तालुक्यातील एकूण ३२३ माजी मालगुजारी तलावांचे सिमांकन करण्याकरीता रुपये ८४.३९ लक्ष निधीची आवश्यकता आहे. मात्र सद्य:स्थितीत कार्यक्रमाच्या पुढील प्रभावी अंमलबजावणीकरीता व निधीच्या योग्य विनियोगा करीता कार्यक्रमाचा सविस्तर आढावा घेवून योजनेखाली हाती घेण्यात आलेल्या कामांची त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपासणी करण्याचा व तोपर्यंत कार्यक्रम स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तपासणी अंती पात्र ठरणाऱ्या कामांकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत निधीच्या उपलब्धतेनुसार नियमानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे आसरे (ता.कोरेगाव, जि.सातारा) या पुनर्वसित गावामध्ये ग्रामपंचायत कार्यालयाचे काम सुरु करण्याबाबत

**(३०) ६१०८ (२३-११-२०२०). श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आसरे (ता.कोरेगाव, जि.सातारा) या पुनर्वसित गावामध्ये मदत व पुनर्वसन विभागाकडून कृष्णा खोरे महामंडळांतर्गत ग्रामपंचायत कार्यालय मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृष्णा-खोरे महामंडळाकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या नकाशामध्ये जेथे ग्रामपंचायत कार्यालय अस्तित्वात आहे तेथे न दाखविता ते अन्य ठिकाणी दाखविण्यात आले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायत कार्यालय बांधकामासाठी संबंधित विभागाकडून निधी मिळून सुध्दा ग्रामपंचायत कार्यालयाची कामे सुरु झाली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने ग्रामपंचायत कार्यालयाचे काम सुरु न करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१७-०३-२०२१) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.

नियमानुसार मंजूर नकाशानुसार ग्रामपंचायत कार्यालय बांधकामाची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर करण्यात येत आहे.
(३) व (४) मौजे आसरे (कुमठे), ता.कोरेगांव या पुनर्वसन गावठाणामध्ये १८ पैकी ग्रामपंचायत व समाजमंदिर इमारतीचे काम ग्रामस्थांच्या दोन गटातील आपआपसातील विरोधामुळे प्रलंबित आहेत.

जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सातारा यांनी दिलेल्या निर्देशानुसार आर.सी.सी. बौध्द समाजमंदिर तसेच ठेवून अतिक्रमण केलेल्या मुतारी व पडक्या इमारतीचे बांधकाम काढून शिल्लक जागेमध्ये रेखांकन आराखड्यानुसार ग्रामपंचायत इमारत बांधण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर करण्यात येत आहे. त्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पो.मुठवली (ता.तळा, जि.रायगड) येथील गौळवाडी ते अडणाळे रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(३१) ६१२० (१३-११-२०२०). डॉ.परिणय फुके, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.प. ३ (४०)

(१) गौळवाडी, पो.मुठवली (ता.तळा, जि.रायगड) येथील गौळवाडी ते अडणाळे रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असून वयोवृध्द नागरिक, गरोदर महिला, रुग्ण यांना प्रवास करणे अत्यंत गैरसोयीचे होत असून रस्त्याच्या दुरवस्थेमुळे सदर ठिकाणी अपघात होऊन जिवित व वित्तहाणी होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीची कामे अनेक वर्षापासून प्रलंबित असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिकांनी रस्ता दुरुस्ती करण्याबाबतचे निवेदन मा.राज्यमंत्री तथा पालकमंत्री रायगड यांचेकडे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०३-०३-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) गौळवाडी ते अडणाळे हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.६७ असून त्याची लांबी २.८५ कि.मी. इतकी आहे. सद्य:स्थितीत सा.क्र.०/०० ते ०/४७० या लांबीचे डांबरीकरण झालेले असून उर्वरित सा.क्र.०/४७० ते २/८५० लांबीचे खडीकरण झालेले आहे. सदर रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत चालू आहे.

उर्वरित २.३८० कि.मी. लांबीच्या रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण, मोरी बांधकाम करण्याचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील आदिवासी पाड्यांमध्ये रस्त्याची सुविधा नसल्याबाबत

**(३२) ६१३० (२३-११-२०२०). श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील दखण्याचा पाडा, वडपाडा, उंबरपाडा, मनमोहाडी भाटीपाडा व कुकडी या आदिवासी गाव पाड्यांमध्ये स्वातंत्र्याची ७४ वर्षे उलटून देखील रस्ता नसल्याचे दिनांक २० सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्याअभावी तेथील आदिवासी आबालवृध्द, गरोदर माता, शाळकरी मुले, ग्रामस्थ व चाकरमान्यांना नदी-नाले ओलांडून पायपीट करावी लागत असून रुग्णांना डोली करुन सात किलो मीटरचा डोंगर पायदळी तुडवित मौ.झाप येथील आरोग्य केंद्रात उपचारासाठी जावे लागते व वेळप्रसंगी सर्पदंश होऊन वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे रुग्णांना जीव गमवावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जव्हार तालुक्यातील या पाड्यांची लोकसंख्या सुमारे १५०० इतकी असून या पाड्याच्या चारही बाजूने डोंगर असल्याने कोणतेच संपर्काचे साधन उपलब्ध नसल्यामुळे तेथील २०० मुले शिक्षण घेत असताना या २०० विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आदिवासींच्या कल्याणासाठी शासन दरवर्षी करोडो रुपये खर्च करीत असताना सदर आदिवासी पाड्यांमध्ये रस्त्यांची बांधकामे व संपर्काची साधने उपलब्ध नसल्याने उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आदिवासी पाड्यांमध्ये रस्त्यांची बांधकामे व संपर्काची साधने उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१०-०३-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सद्य:स्थितीत विद्यार्थ्यांना शिक्षक गृह भेटी देऊन ऑफलाईन पध्दतीने शिक्षण देत आहेत.

(४) दखण्याचा पाडा, वडपाडा, उंबरपाडा, मनमोहाडी हे पाडे राज्यमार्ग ७७ पासून पारंपारिक वहिवाटीच्या पायवाटेने जोडले गेलेले असून मूळ रस्त्यापासून त्यांची एकूण लांबी ३ कि.मी. आहे. तर कुकडी व भाटीपाडा यांच्या पायवाटेची लांबी अंदाजे ५ कि.मी. आहे.

सदर पाडे भौगोलिक दृष्टया अतिदुर्गम, डोंगराळ, दरी खोऱ्याच्या भागात असल्याने आणि सदर पाड्यांना जोडणारी पायवाट खाजगी जमिनीतून व वन विभागाच्या हद्दीतून जात असल्याने सदर पाडे बारमाही रस्त्याने जोडणे जिल्हा परिषदेला शक्य झालेले नाही.

तथापि, सदर पाडे बारमाही रस्त्याने जोडण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्याच्या सूचना जिल्हा परिषदेला देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईत अंमली पदार्थ प्रकरणातील आरोपींवर कारवाई करण्याबाबत

**(३३) ६१४३ (१३-१२-२०२०). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ड्रग्ज (अंमली पदार्थ) प्रकरणी सिने अभिनेता विवेक ऑबेराय यांच्या मुंबई उपनगरातील जुहू येथील घरावर बँगलोर पोलिसांनी छापा घातला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ड्रग्ज (अंमली पदार्थ) प्रकरणी पोलीस कारवाई होण्याच्या भितीमुळे गत महिन्याभरापासून आदित्य अलवा हा फरार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अंमली पदार्थ प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, उपरोक्त तपासाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२०-०५-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक १५/१०/२०२० रोजी सी.सी.बी. बँगलोर शाखेचे पोलीस पथक कॉलापेट पोलीस ठाणे गुर.क्र.१०९/२०, कलम २१, २१(सी), २७(अ), २७(ब) एन.डी.पी.एस. कायदा सह १२०(ब) भा.दं.वि. या गुन्ह्यातील आरोपीत नामे आदित्य अलवा यांचे तपासाकरीता आले होते. सदर तपासात श्री.आदित्य अलवा हा मिळून आला नाही. बँगलोर पोलिसांनी केलेल्या तपासाबाबत जुहू पोलीस ठाणेस, ठाणे दैनंदिनी क्र.१९/२० दिनांक १५/१०/२०२० प्रमाणे नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच श्री.आदित्य अलवा यांच्याविरुध्द जुहू पोलीस ठाणेस कोणताही गुन्हा नोंद नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) विलंब झालेला नाही.

---

## वडाळा (मुंबई) येथील रफी अहमद किडवाई मार्ग पोलीस ठाणे ते रफी अहमद किडवाई मशीद हा रस्ता वाहतुकीसाठी सुरु करण्याबाबत

**(३४) ६३३६ (०२-०२-२०२१). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडाळा, मुंबई येथील रफी अहमद किडवाई मार्ग पोलीस ठाणे ते रफी अहमद किडवाई मशीद हा अवजड वाहनांच्या वाहतुकीसाठी असलेला रस्ता गत ८ महिन्यांपासून बंद करण्यात आल्याने सदर भागात होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, त्यानुसार उक्त रस्ता अवजड वाहनांसाठी पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-०४-२०२१) :** (१) व (२) वडाळा येथील रफी अहमद किडवाई मार्ग पोलीस ठाणे ते रफी अहमद किडवाई मशीद या चार पदरी मार्गावरील एका मार्गिकेवर माहे ऑक्टोबर, २०२० ते नोव्हेंबर, २०२० या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुख्य जलवाहिनीचे दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले होते.

सदर काम माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये पूर्ण करण्यात आले असून, माहे डिसेंबर, २०२० पासून सदर बंद करण्यात आलेली मार्गिका सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी खुली करण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे दहिसर (ता.बोरीवली, जि.मुंबई उपनगर) येथील खारफुटी वनस्पतींचे संरक्षण व संवर्धन करण्याबाबत

**(३५) ६३३७ (०२-०२-२०२१). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये भौतिकरित्या हद्द नसल्यामुळे मौजे दहिसर, ता.बोरीवली येथील खारफुटी वनस्पतींची स्थानिक भूमाफियांकडून अनधिकृतपणे आणि बेसुमार वृक्षतोड सुरु असल्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, बोरीवली यांना सदर प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबतचे आदेश दिनांक ११ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशान्वये तहसिलदार, बोरीवली यांनी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व मा.उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र. ३२४६/२००४ रुपांतरीत जनहित याचिका ८७/२००६ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेल्या आदेशान्वये, तसेच पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अन्वये सदर प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मिरा-भाईंदर आणि मुंबई उपनगर जिल्हयांमध्ये भौतिकरित्या हद्द निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०७-०६-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित मंडळ अधिकारी बोरीवली, नगर भूमापन अधिकारी बोरीवली यांच्या कार्यालयातील परिरक्षण भूमापक, कांदळवन कक्षाचे प्रतिनिधी आणि तक्रारदार यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी इत्यादींच्या उपस्थितीत दिनांक ३/१२/२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळपाहणी दिनांक ०३/१२/२०२० रोजी केली असता, तक्रारीत नमूद मौजे दहिसर येथील स.नं.३४३ व ३४४ पै, न.भू.क्र.१, स.नं.३४०/२, न.भू.क्र.१५१७, स.नं.३३६/२, न.भू.क्र.१५०९ व स.नं.३३०/१, न.भू.क्र.१५५२ या चारही ठिकाणी कांदळवनाची तोड किंवा कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून आले नाही.

सबब, मा.उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र. ३२४६/२००४, रुपांतरित जनहित याचिका क्र. ३२४६/२००४, रुपांतरित जनहित याचिका ८७/२००६ मध्ये दिनांक ६/१०/२००५ रोजी दिलेल्या आदेशान्वये तसेच पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अन्वये कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) व (४) मिरा-भाईंदर आणि मुंबई उपनगर जिल्हा यांमधील भौतिकरित्या हद्द निर्माण/निश्चित करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाने दिनांक ०५/०४/२०२१ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, मुंबई उपनगर तसेच जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, ठाणे यांना नियमानुसार कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे.

---

## राज्यातील पदवीधर अंशकालीन उमेदवारांची कंत्राटी तत्वावर नेमणूक करण्याबाबत

**(३६) ६३६४ (१९-०३-२०२१). श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पदवीधर अंशकालीन उमेदवारांची कंत्राटी तत्वावर नेमणूक करण्याबाबत समितीने केलेल्या शिफारशीनुसार दिनांक ११ डिसेंबर, २०१८ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाव्दारे कौशल्य विकास व उद्योजकता या विभागामार्फत दिनांक २ मार्च, २०१९ रोजी शासन परिपत्रक जारी करण्यात येऊन पदवीधर अंशकालीन उमेदवारांना बाहय यंत्रणेव्दारे नेमणूका देण्याबाबत कार्यवाही करण्याचे सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शासन निर्णयाची राज्यात कोठेही अंमलबजावणी होत नसल्यामुळे त्याची अंमलबजावणी सर्व विभागामार्फत करण्याकरीता त्याबाबतचा शासन निर्णय कौशल्य विकास व उद्योजकता विभागाऐवजी सामान्य प्रशासन विभागामार्फत पारित करण्यात यावा अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सामान्य प्रशासन विभागाकडून शासन निर्णय पारीत करणेकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२३-०४-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे. कौशल्य विकास व उद्योजकता विभागामार्फत मा.मंत्रिमंडळाच्या विचारार्थ प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

(२) मा.मंत्रिमंडळ निर्णयानुसार सामान्य प्रशासन विभागाने पदवीधर अंशकालीन या समांतर आरक्षणांतर्गत घटकातील उमेदवारांसाठी वयोमर्यादा ५५ वर्षे करण्याबाबत दिनांक २/०१/२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित

करण्यात आला. तसेच बाह्य यंत्रणेव्दारे कंत्राटी तत्त्वावरील नियुक्तीबाबत कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडून दिनांक २/०३/२०१९ रोजी शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आले.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

पदवीधर व पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना बाह्ययंत्रणेकडून कंत्राटी नियुक्तीबाबत कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या दिनांक २/०३/२०१९ तसेच वित्त विभागाच्या दिनांक ३०/०९/२०२० अन्वये कार्यवाही करण्यात येते. तथापि, सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याबाबत शासनास निवेदने प्राप्त होत असल्याची बाब लक्षात घेता, दिनांक २२/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सर्व प्रशासकीय विभागांना अंमलबजावणी संदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात बाळासाहेब ठाकरे कृषी प्रक्रिया योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(३७) ६४७७ (०४-०२-२०२१). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतमालाला चांगला दर मिळावा यासाठी ग्रामीण भागात गोदामे-शीतगृहे उभारणे, अन्न प्रक्रिया उद्योग उभारणे यासाठी बाळासाहेब ठाकरे कृषी प्रक्रिया योजना राबविण्याचा निर्णय शासनाने माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेचे स्वरुप काय आहे, यासाठी किती निधीची आवश्यकता आहे व प्रत्यक्षात किती निधी केव्हा उपलब्ध करण्यात आला आहे,

(३) असल्यास, उपरोक्त योजनेची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे काय, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे व यासाठी किती निधी माहे जानेवारी, २०२१ पर्यंत खर्च करण्यात आला आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बाळासाहेब ठाकरे कृषी प्रक्रिया योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१७-०६-२०२१) :** (१) होय, मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.
(२) या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांना उत्पादक कंपन्या/गटांमार्फत संघटीत करुन गट शेतीवर भर देणे व त्या माध्यमातून शेतमालाचे संकलन करुन शेतकऱ्यांना थेट प्रक्रियादार/निर्यातदारांशी जोडून त्यांचा बाजार संपर्क वाढविणे तसेच, राज्यातील सर्व प्रमुख पिकांसाठी स्पर्धात्मक व सर्वसमावेशक मूल्य साखळ्या विकसित करण्यात येणार आहेत. या प्रकल्पासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने एकूण सुमारे २१०० कोटी (US$ ३०० दशलक्ष) गुंतवणूक अपेक्षित आहे. सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात मार्च अखेरपर्यंत प्रकल्पाकरीता रुपये १८.४१ कोटी निधी उपलब्ध करुन दिले आहे.
(३) प्रकल्पात सहभागी होवू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांच्या संस्था व खरेदीदारांचे ऑनलाईन अर्ज मागविण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार ११५९४ संस्थानी नोंदणी केली. ५७६४ संस्थाचे अर्ज प्राप्त झाले असून त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. राज्यात २९ पथदर्शी उप प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. जानेवारी, २०२१ अखेर रुपये ८.४९ कोटी निधी खर्च करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बोडसुला (ता.सेलू, जि.वर्धा) येथील पशुवैद्‌यकीय अधिकाऱ्यांकडून मुदतबाह्य औषध दिल्यामुळे गाईचा मृत्यू झाल्याबाबत

**(३८) ६९३१ (१६-०३-२०२१). श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोडसुला (ता.सेलू, जि.वर्धा) येथील दुग्धव्यवसाय करणारे राम भारती यांच्या गायीला पशुवैद्यकीय अधिकाऱ्याकडून मुदतबाह्य औषधी दिल्या गेल्याने उपचारादरम्यान सदर गाईचा मृत्यू झाल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन बाधित शेतकऱ्यांला नुकसान भरपाई मिळण्याबाबत पशुसंवर्धन उपायुक्तांकडे तक्रार करुनही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (२३-०६-२०२१) :** (१) गाईचा मृत्यू झाला हे खरे असले तरीही मुदतबाह्य औषधी दिल्यामुळे सदरील गाय मृत पावलेली आहे असे प्रथमदर्शनी वाटत नाही. तथापि, गाईचे शवविच्छेदन न झाल्याने मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट झालेले नाही.

(२) व (३) तक्रारदाराने जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, वर्धा यांच्याकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद, वर्धा यांच्यामार्फत चौकशी समिती गठीत करून चौकशी करण्यात आलेली आहे. चौकशी अहवालामध्ये डॉ.पी.एल. भिसेकर, पशुधन विकास अधिकारी, पवैद, हमदापूर, ता.सेलू, जि.वर्धा यांनी मृत गाईचे शवविच्छेदन करणे आवश्यक असताना ते न केल्यामुळे कर्तव्यात कसूर केल्याचे दिसून येते. मृत गाईचे शवविच्छेदन न केल्यामुळे गाईच्या मृत्यूचे नेमके कारण कळू शकलेले नाही.

सदर प्रकरणी प्रादेशिक सह आयुक्त पशुसंवर्धन, नागपूर विभाग, नागपूर यांचेमार्फत सखोल चौकशी करण्याचे निर्देश शासनस्तरावरून आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांना देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मच्छीमार बांधवांसाठी किसान क्रेडिट कार्ड योजना राबविणेबाबत

**(३९) ७०६० (११-०३-२०२१). श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, श्री.सुरेश धस, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १३ मधील प्रश्न क्रमांक ५४३७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशांतर्गत मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांसाठी केंद्र शासनाने किसान क्रेडिट कार्ड योजना लागू केली असल्याचे माहे डिसेंबर, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मत्स्य विभागाने किसान क्रेडिट कार्डचा लाभ किती मच्छीमार बांधवांना दिला आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन किसान क्रेडिट कार्ड योजना राज्यात प्रभावीपणे राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (११-०६-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) जिल्ह्यातील पात्र मच्छीमारांना किसान क्रेडिट कार्ड देण्याबाबत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी तसेच सर्व संबंधित जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक यांना शासनस्तरावरुन कळविण्यात आलेले आहे. तसेच राज्यात सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी दिनांक १०/६/२०२० ते दिनांक १०/१०/२०२० या ४ महिन्यांची विशेष मोहिम राबविण्यात आलेली आहे. दिनांक १९/०५/२०२१ पर्यंत राज्यामध्ये, बॅकांमार्फत मच्छीमार/मत्स्यशेतकरी यांना एकूण ४०१० किसान क्रेडीट कार्ड वितरित करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र बांबू विकास महामंडळातील निधीचा नियमबाहय वापर झाल्याबाबत

**(४०) ७०८० (१५-०३-२०२१). श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील महाराष्ट्र बांबू विकास महामंडळाला सन २०१८-२०१९ या वर्षात केंद्र शासनाकडून रुपये ३३ कोटी प्राप्त झाले असून सदर निधीचा खाजगी व कृषी क्षेत्रासाठी नियमबाहय वापर झाल्याचे दिनांक १७ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०७-०६-२०२१) :** (१) नाही, सन २०१८-२०१९ या वर्षात महाराष्ट्र बांबू विकास मंडळाला एकूण रुपये १६.०८ कोटी इतका निधी प्राप्त झाला असून, सदर निधीचा नियमबाह्य वापर झालेला नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मारेगांव (जि.यवतमाळ) येथील प्रशासकीय कार्यालयात अनेक अधिकाऱ्यांची पदे प्रभारीकडे दिली असल्याबाबत

**(४१) ७३०८ (१७-०३-२०२१). डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मारेगांव (जि.यवतमाळ) येथील प्रशासकीय कार्यालयात अनेक अधिकाऱ्यांची पदे प्रभारीकडे दिली असल्याने नागरिकांना आवश्यक सेवा योग्य प्रकारे मिळत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मारेगांव तालुका प्रशासनातील अधिकाऱ्यांची पदे प्रभारीकडे न देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०७-०६-२०२१) :** (१) होय, जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार जानेवारी, २०२१ च्या स्थितीनुसार मारेगांव, जि.यवतमाळ येथील शासकीय कार्यालयांमधील काही संवर्गातील पदांचे कामकाज प्रभारी कार्यभाराव्दारे पार पाडण्यात येत आहे.
(२) सदर रिक्त पदांचा कार्यभार प्रभारी अधिकाऱ्यांकडे सोपविल्याने नागरिकांना आवश्यक सेवा देण्यात कोणतीही अडचण निर्माण झाली नसल्याचे जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी कळविले आहे. मात्र उक्त रिक्त पदे वित्त विभागाच्या पदभरतीबाबतच्या प्रचलित धोरणाचे अनुपालन करून नियमितरित्या (सरळसेवा/पदोन्नतीने) भरण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य निवडणूक आयोगाच्या नियमांमध्ये ऐन निवडणूकीच्या वेळी बदल होत असल्याबाबत

**(४२) ७३४८ (१७-०३-२०२१). डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य निवडणूक आयोगाच्या नियमांमध्ये ऐन निवडणूकीच्या वेळेवर वेगवेगळे बदल केले जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नामनिर्देशन पत्र भरण्याचा दिनांक ते नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक या कालावधीमध्ये ऑफलाईन किंवा ऑनलाईन या दोन पध्दती वापरण्यात येतात त्यामुळे इच्छुक उमेदवारांमध्ये संभ्रमाचे वातावरण व गोंधळ होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य निवडणूक आयोग ऑनलाईन किंवा ऑफलाईन यापैकी कोणत्याही एकाच पध्दतीचा अवलंब करून कायमस्वरूपी नियमावली तयार करण्याची बाब विचाराधीन आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (११-०६-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) राज्य निवडणूक आयोगाकडून स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांकरीता ऑनलाईन पध्दतीने नामनिर्देशनपत्रे मागविण्यात येतात. मात्र जर एखाद्या प्रसंगी तांत्रिक अडचणी जसे इंटरनेट गती कमी, सर्व्हर अडचणी इ. तक्रारी आयोगाकडे प्राप्त झाल्यास सदर बाब विचारात घेऊन इच्छूक उमेदवार नामनिर्देशनापासून वंचित राहू नयेत आणि त्यांना निवडणूक लढविण्याची संधी मिळावी म्हणून आयोगातर्फे संस्थांच्या नामनिर्देशनपत्र पारंपारीक पध्दतीने (Offline mode) स्वीकारण्याचा तसेच नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची वेळ वाढविण्याचा निर्णय घेतला जातो व त्यास योग्य ती प्रसिध्दी देण्यात येते. राज्य निवडणूक आयोगाकडून ऑनलाईन सुविधा बदलण्यात येत नसून त्यासोबत अतिरिक्त सुविधा बदलण्यात येत नसून त्यासोबत अतिरिक्त सुविधा म्हणून ऑफलाईन सुविधा देखील उपलब्ध करून दिली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शेती उत्पन्न वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(४३) ७५०८ (०४-०२-२०२१). श्री.अरुण लाड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ६० टक्के नागरिक शेतीवर आपली उपजिविका करीत असून शेतीविषयक जोडधंदे हे त्यांच्या उपजिविकेचे साधन असताना वातावरणीय बदल आणि शेतीविषयक शासनाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयामुळे शेतकऱ्यांचे

आर्थिक नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांची मुले पारंपारिक शेती व्यवसाय करण्याऐवजी इतर क्षेत्राकडे वळत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यदरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतीतून होणारे उत्पन्न वाढण्याच्या दृष्टीने तसेच शेतकऱ्यांची आर्थिक सुधारणा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१७-०६-२०२१) :** (१) नाही. अशा आशयाचे पत्र प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) शेतीविषयक निर्णय हे शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीच्या दृष्टीने फायदेशीर असे घेतले जातात. वातावरणीय बदलामुळे/नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकाच्या होणाऱ्या नुकसानीबाबत शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागामार्फत वेळोवेळी मदत केली जाते. वातावरण बदल व इतर नैसर्गिक घटकांमुळे होणारे शेतीच्या नुकसानीमध्ये शेतकऱ्याचे आर्थिक स्थैर्य राखण्यासाठी कृषी विभागामार्फत प्रधानमंत्री पीक विमा योजना व हवामान आधारीत फळपीक विमा योजना राबविण्यात येतात.

त्याचप्रमाणे हवामान बदलास अतिसंवेदनशील असलेल्या विदर्भ व मराठवाड्यातील ४२१० गावे तसेच विदर्भातील पूर्णा नदीच्या खोऱ्यातील खारपाण पट्टयातील ९३२ गावे अशा एकूण ५१४२ गावांमध्ये ६ वर्षे कालावधीत जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पातून हवामान अनुकूल शेतीकरीता पुढील बाबीव्दारे मार्गदर्शक व अर्थसहाय्य दिले जाते.

१. हवामान अनुकुल तंत्रज्ञान विषयक प्रशिक्षण.
२. मृद व जलसंधारण कामे.
३. वैयक्तिक घटकाच्या बाबींसाठी अर्थसहाय्य.
४. शेतकरी उत्पादक कंपनी/शेतकरी गट/बचतगट यांना अर्थसहाय्य.
५. हवामान अनुकुल शेतीशाळा.

६. हवामान अनुकूल वाणांचे पायाभूत व प्रमाणित बियाण्यांचे बीजोत्पादन करीता अर्थसहाय्य.
७. कृषी हवामान सल्ला-सेवा.
८. गावनिहाय खरीप हंगाम नियोजन बैठका .

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्याच्या सागरी किनारी भागात पायाभूत सुविधांच्या विकासासाठी योजना राबविण्याबाबत

**(४४) ७५६३ (०४-०२-२०२१). श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सागरी किनारी भागात पायाभूत सुविधांच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या "पायाभूत सुविधा विकास निधी" योजनेंतर्गत मत्स्यव्यवसाय विभागाने केंद्रीय मत्स्यव्यवसाय विभागासोबत त्रिपक्षीय करार माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या त्रिपक्षीय करारावर मत्स्यव्यवसाय विभागाच्या सचिवांसोबत वित्त विभागाचे सचिव व नाबार्डचे मुख्य व्यवस्थापक यांनी सुध्दा स्वाक्षऱ्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या त्रिपक्षीय कराराचे थोडक्यात स्वरुप काय आहे व या कराराची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (११-०६-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) राज्याच्या सागरकिनारी भागात पायाभूत सुविधांच्या विकास करणे हे या कराराचे स्वरुप आहे. सदर त्रिपक्षीय कराराप्रमाणे पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय भाडेपट्टी (लीज) जमिनींच्या गैरव्यवहाराबाबत

**(४५) २३५२९ (३०-१२-२०१६). श्री.जयंत पाटील, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्याच्या विविध भागात शासकीय भाडेपट्टयाच्या हजारो (लीज) जमिनींची मुदत अनेक वर्षापूर्वी संपलेली असून मुंबई शहरातील सुमारे १२५० तर उपनगरातील ४५० लीजच्या जमिनी असून ६९१ जमिनींच्या भाडेपट्ट्याचा करार संपूनही अनेक वर्षे परवान्यांचे नुतनीकरण करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल विभागाची परवानगी न घेताच काही लीज जमिनींवर पुनर्विकास प्रकल्प उभारल्याचे तर काही जमिनी पोट भाडेकरुला भाड्याने देण्यासारखे आणि त्याची परस्पर विक्री करण्यासारखे प्रकार तसेच शासकीय जमिनीची बनावट कागदपत्रे करून सदर जमिनींची विक्री करून शासनाचा कोटयवधी रूपयांचा महसूल बुडविण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या मालकीच्या किती जमिनी भाडेपट्टयाने (लीजने) साधारणत: केव्हापासून देण्यात आलेल्या आहेत व त्यापैकी किती जमिनींचे नुतनीकरण करण्यात आलेले नाही,

(४) असल्यास, शासकीय जमिनींचे भाडे करार संपल्यानंतरही परवान्याचे नुतनीकरण न करणाऱ्या संस्था किंवा कंपन्यांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१७-०६-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

शासकीय मिळकतीवर पुनर्विकासाची अर्जदार यांनी मागणी केल्यावर याबाबतच जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सविस्तर अहवाल शासनास सादर करण्यात आल्यानंतर शासनाच्या मान्यतेने पुनर्विकास मूल्य वसूल करुन पुनर्विकासास परवानगी देण्यात येते.

(३) ब्रिटीश काळापासून शासकीय मिळकती भाडेपट्ट्याने देण्यात आल्या आहेत. आतापर्यंत मुंबई शहर जिल्ह्यात १३०७ व मुंबई उपनगर जिल्ह्यात ३५६ असे एकूण १६६३ मिळकती भाडेपट्ट्याने देण्यात आल्या असून त्यापैकी मुंबई शहर जिल्ह्यात ६४० व मुंबई उपनगर जिल्ह्यात ७६ मिळकतींचे नुतनीकरण करण्यात आलेले नाही.

(४) मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्णय विचारात घेवून तद्नंतर बृहन्मुंबईतील शासकीय जमिनीच्या भाडेपट्टयाच्या नुतनीकरणासंदर्भात शासन निर्णय क्र. जमीन-२५०५/प्र.क्र.४०५/ज-२, दिनांक १२/१२/२०१२ अन्वये सुधारित धोरण विहित करण्यात आले आहे. सदर नवीन धोरणानुसार संबंधितांची सुनावणी घेवून नुतनीकरणाबाबत निर्णय घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इगतपुरी (जि.नाशिक) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्याबाबत

**(४६) ३५८४० (०२-०१-२०१८). डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी (जि.नाशिक) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांच्या कमी संख्येमुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा खालावत असून विद्यार्थ्यांच्या निकालावरही परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इगतपुरी तालुक्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्यासाठी तसेच कायमस्वरुपी गटशिक्षण अधिकारी नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०१-०६-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) राज्यातील शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर भरती प्रक्रिया राबविताना जिल्हा परिषदांमधील शिक्षकांच्या रिक्त जागा भरणे शक्य होणार आहे. तसेच शालेय शिक्षण विभागाच्या आदेशान्वये पंचायत समिती, इगतपुरी येथे नियमित गटशिक्षणाधिकारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातारा जिल्हयातील शिक्षकांच्या रजा रद्द करण्याच्या आदेशाबाबत

**(४७) ३६०२४ (०२-०१-२०१८). श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाळा सोडून बदली आदेश रद्द करण्यासाठी खंडपीठात आलेल्या सातारा जिल्हयातील शिक्षकांच्या रजा रद्द करण्याचे आदेश औरंगाबाद खंडपीठाने एका याचिकेच्या सुनावणीत दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सामुहिक बदली प्रकरणात अन्य मार्गाने झालेल्या बदल्यांच्या विरोधात त्या त्या शिक्षकांना न्यायालयीन प्रक्रिया करण्याकरीता अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, खंडपीठात न्याय मागण्याकरीता गेलेल्या शिक्षकांवरही अन्यायकारक कारवाई करण्यात आली, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.हसन मुश्रीफ (०१-०६-२०२१) :** (१), (२) व (३) हे खरे नाही. जिल्हा परिषद, सातारा येथील कर्मचाऱ्यांच्या आस्थापनाविषयक बाबींशी संबंधित न्यायालयीन प्रकरणे ही मुख्यत्वे मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केली जातात. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडून अशाप्रकारचे कोणतेही आदेश सातारा जिल्हा परिषदेस प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई येथील समुद्रातील भराव व जमिनीचा चढउतार यांचा एकत्रित नकाशा तयार करण्याबाबत

**(४८) ४४२०८ (०५-१२-२०१८). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भूरचनेचा एकसंघ शास्त्रोक्त अभ्यास उपलब्ध नसल्याने येथे होणारी विकास कामे कमकुवत स्वरुपाची असून गत दोनशे वर्षात समुद्रात टाकलेला भराव हेच मुंबईतील जमीन खचण्यात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समुद्रातील भराव व जमिनीचा चढउतार यांचा एकत्रित नकाशा तयार करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०६-२०२१) :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील इमारत विषयक विकास कामांची आर.सी.सी. संरचना व संरचनात्मक सुरक्षा (Structural stability) ही संरचना अभियंता (Structural Engineer) यांनी राष्ट्रीय इमारत संहितेनुसार असणे आवश्यक आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २००८ व २००९ साली ब्रिमस्टोवॅड-II अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील अस्तित्वात असलेल्या जमिनीचा लिडार व हवाई छायाचित्रणाव्दारे सर्वेक्षण करून चढउतार नकाशा (Contour Map-०.२० Mtr. अंतरावर) तयार करण्यात आला आहे. सदर सर्वेक्षण व नकाशा ब्रिमस्टोवॅड-II अंतर्गत महानगरपालिका हद्दीतील अस्तित्वात असलेल्या पर्जन्य जलवाहिन्यांच्या सुधारणेसाठी वापरण्यात येतो, जेणेकरून पावसाच्या पाण्याचा निचरा लवकर होऊन पूरसदृष्य परिस्थिती निर्माण होणार नाही.

(३) लागू नाही.

---

## आदिवासी आश्रमशाळांमध्ये घड्याळी तासांच्या मानधनावर काम करणाऱ्या शिक्षकांबाबत

**(४९) ४६२४९ (१२-०२-२०१४). श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाच्या प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळांमध्ये शिक्षकांच्या जिल्हानिहाय रिक्त पदांची संख्या किती आहे,

(२) असल्यास, प्राथमिक आश्रमशाळांमध्ये घडयाळी तासांच्या मानधनावर काम करणाऱ्या शिक्षकांची संख्या किती आहे,

(३) असल्यास, या शिक्षकांना प्रती घडयाळी तास किती मानधन दिले जाते,

(४) असल्यास, घडयाळी तासावर काम करणाऱ्या शिक्षकांच्या मानधनात वाढ करण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षण मतदार संघाचे लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ ऑक्टोबर, २०१३ रोजी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड.के.सी.पाडवी (०२-०६-२०२१) :** (१) शिक्षक संवर्गासाठी नियुक्ती व शिस्तभंग यासाठी अपर आयुक्त, आदिवासी विकास हे सक्षम प्राधिकारी असून महसूल विभागनिहाय प्राथमिक व माध्यमिक शिक्षक संवर्गातील रिक्त पदांची संख्या खालीलप्रमाणे :-

| **विभागीय कार्यालय निहाय रिक्त पदे** | | |
|---|---|---|
| **महसूल** | **प्राथमिक शिक्षक** | **माध्यमिक शिक्षक** |
| नागपूर | २७० | ६७ |
| अमरावती | १९० | १०८ |
| औरंगाबाद | ३५ | ४२ |
| कोकण | १६१ | ११४ |
| नाशिक | ५५१ | ३२८ |
| पुणे | २८ | ३६ |
| **एकूण** | **१२३५** | **६९५** |

(२) पदवीधर प्राथमिक शिक्षक १७४ व प्राथमिक १०२७ असे एकूण १२०१ शिक्षक घडयाळी तासिका पध्दतीने कार्यरत होते. सद्य:स्थितीत कोरोनाच्या महामारीमुळे घडयाळी तासिका पध्दतीवर शिक्षक कार्यरत नाहीत.
(३), (४), (५) व (६) आदिवासी विकास विभागाच्या दिनांक ७ जून, २०१७ रोजीच्या घड्याळी तासिका तत्वावर नेमलेल्या शिक्षकांच्या मानधनात दिनांक १ जून, २०१७ पासून वाढ करण्यात आली असून त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | पद | मानधन/प्रति घड्याळी तास |
|---|---|---|
| १ | **उच्च माध्यमिक शिक्षक** | |
| | पुर्ण अर्हता धारक | १५०/- |
| | अपूर्ण अर्हता धारक | १४०/- |
| २ | **माध्यमिक स्तर शिक्षक** | |
| | पुर्ण अर्हता धारक | १४०/- |
| | अपूर्ण अर्हता धारक | १२५/- |
| ३ | **प्राथमिक स्तर शिक्षक** | |
| | पुर्ण अर्हता धारक | १२५/- |
| | अपूर्ण अर्हता धारक | ११५/- |

---

## भिवंडी (जि.ठाणे) येथील अजयनगर परिसरात कचराकुंडीत आधार कार्ड सापडल्याबाबत

**(५०) ४७०७९ (१२-०७-२०१९). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील अजयनगर परिसरातील एका कचराकुंडीत ३५० आधार कार्ड सापडल्याची घटना माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२५-०६-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) भिवंडी, जि.ठाणे येथील अजयनगर परिसरातील एका कचराकुंडीत ३५० आधारकार्ड सापडल्याची घटना मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे. त्यानुषंगाने निजामपूर पोलीस स्टेशनमार्फत सदर ३५० आधारकार्ड दिनांक ०७/०३/२०१९ रोजी ताब्यात घेऊन पोस्ट ऑफिस भिवंडी यांच्या ताब्यात देण्यात आली आहेत. सदर घटनेची नोंद निजामपुर पोलीस ठाणे येथील स्टेशन डायरीला घेण्यात आली असून संबंधित पोस्टमन श्री.संतोष जाधव यांना दिनांक १३/०३/२०१९ रोजी पोस्ट कार्यालयातून निलंबित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **श्री.राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.